


निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

✻ नांदेड ✻ परभणी ✻ हिंगोली

✻ मुख्य संपादक ✻
सुग्रीव सोपानराव मुंडे
✻ आवृत्ती संपादक ✻
लक्ष्मीकांत नामदेवराव मुंडे

E-Paper :
www. attachexpress.in
Post Regd.No.
LII/PBN/RNP-183/20021-22

✻ वर्ष १० वे ✻ अंक २८८ ✻ किंमत - २ रु | RNI.No. MAH/MAR2014/56289 | ✻ गुरूवार दि.१९ फेब्रुवारी २०२६ | ✻ पाने-४



छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने भव्य दीपोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी शिवजयंती महोत्सव समितीच्या अध्यक्षा सुनीताताई मुळे यांच्यासह सर्व शिवजयंती महोत्सव समिती पदाधिकारी, महिला समिती कार्यकर्त्या उपस्थित होत्या. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसर दीपोत्सवाने प्रकाशमय झाला होता (छाया–सुनील पाठक हिंगोली)

## मुस्लीम समाजाला देण्यात आलेलं ५ टक्के आरक्षण रद्द, शासनाकडून सुधारित शासन निर्णय जारी

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई –** मुस्लीम समाजाला देण्यात आलेल्या आरक्षणासंदर्भात महत्वाची बातमी समोर आली आहे. मुस्लीम समाजाला देण्यात आलेलं ५ टक्के आरक्षण रद्द करण्यात आलं आहे. मुस्लिम समाजासाठी राबवण्यात येणाऱ्या जात प्रमाणपत्र प्रक्रियेला ब्रेक लावण्यात आला आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी सरकारने दिलेल्या आरक्षणानंतर प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. पण आता राज्य शासनाकडून सुधारित शासन निर्णय प्रकाशित करण्यात आला आहे. आरक्षणाचा शासनादेश आणि परिपत्रक जारी करण्यात आलं असून, त्यात आरक्षण रद्द करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे.

शासन निर्णयात मुस्लिम समाजाला देण्यात आलेले २३ डिसेंबर २०१४ रोजीचे आरक्षण रद्द झाल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. आरक्षण रद्द झाल्यानंतरही राबवली जाणारी जात प्रमाणपत्र वितरण आणि वैधता प्रक्रियेला शासनाकडून ब्रेक लावण्यात आला आहे.

लोकसभा निवडणुकीत दारुण पराभव झाल्यानंतर, आगामी विधानसभा निवडणुकांकडे लक्ष ठेवून असलेल्या महाराष्ट्र सरकारने मराठा आणि मुस्लिम आरक्षणासंदर्भात निर्णय घेतला होता. सरकारने सरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थांमध्ये मराठ्यांना १६ टक्के आणि मुस्लिमांना ५ टक्के आरक्षण जाहीर केले होते. यामुळे राज्यातील एकूण आरक्षण ७३ टक्के झाले होते. राज्याचे अल्पसंख्याक कल्याण मंत्री नसीम खान यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुस्लिम समुदायासाठी ५ टक्के आरक्षणाचा प्रस्ताव मांडला होता. कोणत्याही चर्चेशिवाय एकमताने हा प्रस्ताव मंजूर करण्यात आला होता. सामाजिक शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या मुस्लिम गटासाठी विशेष मागास प्रवर्ग–अ अंतर्गत शासकीय व निमशासकीय सरळसेवा भरतीमध्ये व शैक्षणिक संस्थेतील प्रवेशासाठी ५ टक्के आरक्षण सामान्य प्रशासन विभागाच्या वाचा क्र १ येथील अध्यादेशान्वये विहीत करण्यात आले होते. त्यानुसार, वाचा क्रं २ येथील अल्पसंख्यांक विकास विभागाच्या शासन निर्णयान्वये सरळ सेवेच्या पदभरतीमध्ये विशेष मागास प्रवर्ग–अ (एसबीसी–ए) प्रवर्गासाठी ५ टक्के आरक्षण देण्यात आले होते. अल्पसंख्याक विकास विभागाच्या वाचा क्र.२ येथील शासन निर्णयातील निदेशानुसार या विभागाकडून वाचा क्र.३ येथील शासन निर्णय व वाचा क्र ५ येथील शासन परिपत्रकान्वये विशेष मागास प्रवर्ग–अ मधील मुस्लिम समाजास नियमानुसार जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्रे देण्याबाबतची कार्यवाही करण्यासंदर्भात सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या.

## महाराष्ट्रातील ७ जागांसह देशातील ३७ राज्यसभा जागांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली –** भारतीय निवडणूक आयोगाने बुधवारी देशातील १० राज्यांमधील राज्यसभेच्या ३७ जागांसाठी द्विवार्षिक निवडणुकींचा कार्यक्रम जाहीर केला आहे. ही निवडणुकीसाठी १६ मार्च रोजी मतदान होणार असून त्याच दिवशी संध्याकाळी मतमोजणी केली जाणार आहे.

राज्यसभेच्या या ३७ जागा येत्या एप्रिल महिन्यात रिक्त होणारा आहेत. महाराष्ट्र (७), ओडिशा (४), तमिळनाडू (६), पश्चिम बंगाल (५), आसाम (३), बिहार (५), छत्तीसगड (२), हरियाणा (२), हिमाचल प्रदेश (१) आणि तेलंगणा (२) अशी या जागांची संख्या आहे.

राज्यसभेचा कार्यकाळ संपणार असलेल्या नेत्यांमध्ये अनेक बड्या नावांचा समावेश आहे. ज्यामध्ये शरद पवार, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, काँग्रेसचे नेते अभिषेक मनू सिंघवी, तृणमूल काँग्रेसचे नेते साकेत गोखले, आणि राज्यसभेचे उप सभापती हरिवंश नारायन सिंह यांचा समावेश आहे.

निवडणूक आयोगाने जारी केलेल्या वेळापत्रकानुसार, या निवडणुकींचे नोटिफिकेशन २६ फेब्रुवारी रोजी जारी केले जाईल. तर अर्ज दाखल करण्याची अखेरची तारीख ही ५ मार्च असणार आहे. अर्जाची छाननी आणि ही ६ मार्च रोजी केली जाईल आणि अर्ज माघारी घेण्याची अखेरची तारीख ९ मार्च असणार आहे. तर १६ मार्च रोजी सकाळी ९ वाजल्यापासून दुपारी ४ पर्यंत मतदान होईल आणि त्यानंतर ५ वाजता मतमोजणीला सुरूवात होईल. निवडणुकीची प्रक्रिया ही २० मार्चपर्यंत पूर्ण केली जाईल.

## पायलटच्या मदतीनेच अजित पवारांचा घातपात; रोहित पवारांचा थेट आरोप

### अवाजवी इंधनामुळे स्फोट; विमान अपघातावर नवे प्रश्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई –** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी रोजी बारामतीजवळ झालेल्या विमान दुर्घटनेत निधन झाले. मुंबईहून सभेसाठी निघालेल्या त्यांच्या विमानाने बारामती विमानतळाजवळ येताना अचानक एका बाजूला झुकत खाली कोसळल्याची माहिती समोर आली होती. विमान जमिनीवर आदळल्यानंतर मोठा स्फोट झाला आणि त्यानंतर आगीने भीषण रूप घेतले. या दुर्घटनेत अजित पवार यांच्यासह त्यांचे सुरक्षारक्षक विदीप जाधव, पायलट सुमीत कपूर, शांभवी पाठक आणि विमान परिचारिका पिंकी माळी यांचा मृत्यू झाला. या घटनेने संपूर्ण राज्याला मोठा धक्का बसला होता.

मात्र ही केवळ दुर्घटना नसून यामागे घातपात असू शकतो, अशी शंका राष्ट्रवादीचे नेते रोहित पवार यांनी व्यक्त केली आहे. गेल्या काही दिवसांपासून त्यांनी या प्रकरणी अनेक मुद्दे उपस्थित केले असून मुंबई आणि दिल्ली येथे पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका स्पष्ट केली होती. आज मुंबईतील वाय बी चव्हाण सभागृहात घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी पुन्हा एकदा हा अपघात नसून नियोजित कट असल्याचा दावा केला. पायलटच्या मदतीनेच हा घातपात घडवण्यात आला असावा, असा गंभीर आरोप त्यांनी केला.

रोहित पवार यांनी सांगितले की, अपघाताच्या ठिकाणाची पाहणी केल्यावर काही बाबी संशयास्पद वाटतात. एखादा चेंडू मऊ मातीत पडला तर कमी उसळी घेतो, पण कठीण रस्त्यावर पडला तर जास्त उड्या घेतो, असे उदाहरण देत त्यांनी



सांगितले की विमान धावपट्टीवर न पडता बाजूच्या कठीण पृष्ठभागावर आदळले. त्यामुळे त्याचा धक्का अधिक तीव्र झाला. स्फोटाचे मुख्य कारण विमानातील जादा इंधन असू शकते, अशी शंका त्यांनी व्यक्त केली.

त्यांच्या मते, या विमानातील इंधन टाक्या नेहमीपेक्षा जास्त भरलेल्या होत्या. सामान्यतः अशा विमानांमध्ये प्रसाधनगृहाजवळ इंधन टाक्या असतात आणि त्याच्या जवळच उड्डाण नोंद यंत्र असते, अशी माहिती त्यांनी दिली. मुंबईहून बारामतीकडे जाताना इंधन पूर्ण क्षमतेने भरले गेले होते. मात्र बारामतीला पोहोचल्यानंतर विमान पुढे जाणार होते, तर तेथेच पूर्ण इंधन भरण्याची गरज काय होती, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

रोहित पवार यांनी पुढे सांगितले की, जर महाराष्ट्रात इंधन स्वस्त आहे म्हणून ते भरले असेल, तर गुजरातमध्ये त्याहून स्वस्त इंधन उपलब्ध होते, असा युक्तिवादही त्यांनी मांडला. त्यामुळे एवढ्या अल्प अंतराच्या प्रवासासाठी टाक्या पूर्ण भरण्याचा निर्णय का घेतला गेला, हे तपासले पाहिजे, असे त्यांनी म्हटले. जादा इंधन असल्यास स्फोटाची तीव्रता वाढते, ही शंका आता खरी ठरत असल्याचे ते म्हणाले.

या सर्व बाबींचा विचार करता हा अपघात नसून नियोजित कट असण्याची शक्यता नाकारता येत नाही, असा ठाम दावा रोहित पवार यांनी केला. पायलटची भूमिका संशयास्पद असल्याचे सांगत त्यांनी सखोल आणि निष्पक्ष चौकशीची मागणी केली. या प्रकरणातील प्रत्येक तांत्रिक बाबीची तपासणी झाली पाहिजे, तसेच इंधन भरण्याच्या निर्णयामागील कारणांचा शोध घेतला पाहिजे, असे ते म्हणाले. अजित पवार यांच्या आकस्मिक निधनानंतर आधीच राज्यात भावनिक वातावरण निर्माण झाले आहे. त्यात आता घातपाताच्या आरोपांमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. रोहित पवार यांनी केलेल्या दाव्यांमुळे या प्रकरणाला नवे वळण मिळाले असून, पुढील तपासातून नेमके काय निष्पन्न होते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## राष्ट्रवादीच्या विलीनीकरणावर कोणतीही चर्चा होणार नाही

### प्रफुल पटेलांची स्पष्ट भूमिका, रोहित पवारांच्या आरोपावर सावध प्रतिक्रिया

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई –** राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाबाबत राजकीय वर्तुळात सुरू असलेल्या चर्चांना प्रफुल पटेल यांनी पूर्णविराम दिला आहे. ''दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणावर कोणतीही चर्चा होणार नाही,'' असे स्पष्ट करत त्यांनी पक्षाच्या भविष्यातील नेतृत्वाबाबत मोठी घोषणा केली. आगामी २६ फेब्रुवारी रोजी सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड होईल, असे पटेल यांनी आज माध्यमांशी बोलताना सांगितले.

अजित पवार यांच्या निधनानंतर निर्माण झालेली नेतृत्वाची पोकळी भरून काढणे ही पक्षाची जबाबदारी असल्याचे पटेल यांनी नमूद केले. ते म्हणाले, ''अजितदादांच्या निधनानंतर ही वेळ विलीनीकरणावर चर्चा करण्याची नाही. आज आमचा पक्ष स्वतंत्र आहे आणि आमची संघटनात्मक पदे किंवा विधिमंडळ नेतृत्वाची जागा भरण्याची जबाबदारी आमच्यावर आहे. ती प्रक्रिया आम्ही पूर्ण करत आहोत.''

अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत बोलताना प्रफुल पटेल यांनी थेट विमान कंपनीला जबाबदार धरले आहे. ''या दुर्दैवी घटनेत विमान कंपनीची जबाबदारी सर्वात मोठी आहे. पायलटकडून काही दुर्लक्ष झाले असेल, तर ते सीबीआयच्या चौकशीत निश्चितपणे समोर येईल. मात्र, सकृतदर्शनी विमान कंपनी या दुर्घटनेला मोठ्या प्रमाणात जबाबदार असल्याचे मला वाटते,'' असे त्यांनी स्पष्ट केले.

अजित दादांचा अपघात होण्यापूर्वी पूर्व विदर्भातील एका नेत्याचा त्यांना फोन केला होता, असा आरोप रोहित पवार यांनी केला होता. यावर प्रफुल पटेल यांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, ''अजित पवारांच्या निधनाच्या आदल्या दिवशी मी त्यांना फोन केला होता. पण शेतकऱ्यांसाठी केला होता. कुणाची खासगी फाईल किंवा कुणाला मदत करण्यासाठी केला नाही. एक उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री म्हणून त्यांनी त्या दिवशी माझा फोनसह अनेक लोकांचे फोन त्यांना आले असतील. अनेकांनी त्यांना वेगवेगळ्या कामांची निवेदने दिली असतील. याचा अर्थ मी कुठल्याही कारणाने त्यांना थांबवण्याचे काम केले असा होत नाही. मी तेव्हा दिल्लीत होतो आणि अजित पवार कुठे आहेत हे मला माहीत नव्हते. मी त्यांना दिल्लीतून फोन केला होता''

''पायलटने अजितदादांचे विमान मुद्दामहून खाली पाडले,'' असा खळबळजनक आरोप आमदार रोहित पवार यांनी केला होता. यावर प्रफुल पटेल यांनी अत्यंत सावध आणि जबाबदार प्रतिक्रिया दिली. ''मी एक जबाबदार व्यक्ती आहे. अनेक वर्षांच्या राजकारणात आणि सरकारमध्ये माझा अनुभव राहिलेला आहे. मी जे काही बोलेन ते संयमाने आणि जबाबदारीने बोलेन. माझ्याकडे तथ्य असल्याशिवाय कुठलाही आरोप–प्रत्यारोपचे उत्तर देणे मला योग्य वाटत नाही,'' असे म्हणत त्यांनी रोहित पवारांच्या आरोपावर थेट भाष्य करणे टाळले.

अजित दादा यांचे जाणे ही फार दुर्दैवी घटना आहे. या घटनेच्या सखोल तपास विविध यंत्रणेद्वारे होत आहे. राज्य सरकार सुद्धा तपास करत आहेत. परंतु यामध्ये अनेक लोकांनी शंका कुशंका व्यक्त केल्या आहेत. त्यामुळे याची सखोल तपासणी होणे आवश्यक आहे. अचानकपणे एवढी मोठा दुर्घटना कशी होऊ शकते, याची सीबीआय द्वारा चौकशी करण्यात यावी आणि ही महाराष्ट्रात घटना झाल्यामुळे महाराष्ट्र सरकार याबाबत सीबीआयला चौकशी करण्यात सांगू शकते. म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस तर्फे आम्ही काल निवेदन देऊन या प्रकरणाची सीबीआय चौकशी करण्याची मागणी केली आहे, असे वक्तव्य प्रफुल पटेल यांनी केले.

## चंद्रपूरचा बदला आम्ही परभणीत घेतला नाही– रमेश चेन्नीथला

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई –** राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीनंतर महापौर पदाच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने दमदार कामगिरी केली. मात्र, यामध्ये सर्वाधिक चर्चा चंद्रपूर महापालिकेची झाली. गेल्या काही दिवसांपासून चर्चेच्या केंद्रस्थानी असलेल्या चंद्रपूर महापालिकेत काँग्रेसचे सर्वाधिक नगरसेवक निवडून आले होते. पण तरीही भाजपाने ठाकरे गटाच्या पाठिंब्याने सत्तास्थापन करत आपला महापौर बसवला.

सर्वाधिक नगरसेवक निवडून आले असतानाही काँग्रेसला सत्तास्थापनेपासून दूर राहावं लागल्यामुळे काँग्रेसला मोठा धक्का बसला. दरम्यान, चंद्रपूर महापालिकेत शिवसेना ठाकरे गटाने भाजपाला पाठिंबा दिल्याने उद्धव ठाकरे यांच्यावर काँग्रेस नाराज असल्याची चर्चा आहे. या सर्व घडामोडींवर आज काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी सूचक भाष्य केलं आहे.'चंद्रपूरचा बदला आम्ही परभणीत घेतला नाही', असं रमेश चेन्नीथला यांनी अप्रत्यक्ष उद्धव ठाकरे यांना सुनावलं आहे.

''चंद्रपूर महापालिकेच्या महापौर पदाच्या पार्श्वभूमीवर ज्या घडामोडी घडल्या आहेत, त्यावर आज झालेल्या बैठकीत सविस्तर चर्चा झाली.

चंद्रपूर महापालिकेत आमच्याकडे २७ चं संख्याबळ होतं. पण तरीही आमच्याकडे बहुमत नव्हतं. बहुमत नसलं तरी आमच्या पक्षाने चंद्रपूर महापालिकेच्या निवडणुकीत चांगलं यश मिळवलं. मात्र, झालं असं की शिवसेना (ठाकरे) पक्षाच्या ८ नगरसेवकांनी भारतीय जनता पक्षाला पाठिंबा दिला. त्यामुळे चंद्रपूर महापालिकेच्या महापौर पदाच्या निवडणुकीत आम्हाला अपयश आलं. मात्र, दुसरीकडे परभणीत आम्ही भाजपाला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी शिवसेना (ठाकरे) पक्षाला पाठिंबा दिला'', असं रमेश चेन्नि‍थला यांनी म्हटलं आहे.

## 'गंभीर गुन्ह्यातील जामिनाची तत्त्व गंभीर आर्थिक गुन्ह्यांनाही लावायला हवी', सुप्रीम कोर्टाची महत्त्वाची टिप्पणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली –** सर्वोच्च न्यायालयात अनेक महत्वाच्या प्रकरणांवर सुनावणी पार पडत असते. त्यापैकी काही प्रकरणावरील सुनावणी दरम्यान सर्वोच्च न्यायालय महत्वाची टिप्पणी करत असतं. आता अशाच एका प्रकरणावरील सुनावणी दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने एक महत्त्वाची टिप्पणी केली आहे. 'गंभीर गुन्ह्यातील जामिनाची तत्त्व गंभीर आर्थिक गुन्ह्यांनाही लावायला हवीत', असं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे.

न्यायमूर्ती संजय कुमार आणि के विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने ही महत्त्वाची टिप्पणी करताना अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनौ खंडपीठाचा आदेश रद्दबातल ठरवला आहे. ज्यामध्ये लखनौ खंडपीठाने आर्थिक गुन्ह्यातील आरोपीला जामीन मंजूर केला होता.

या प्रकरणावर निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं की,''गंभीर गुन्ह्यांमध्ये जामिनाचे नियमन करणारी तत्त्व गंभीर आर्थिक गुन्ह्यांनाही तितकीच लागू पडतात. कारण अशा गुन्ह्यांचा थेट परिणाम नागरिकांच्या आर्थिक गोष्टींवर आणि जीवनमानावर होत असतो.''

दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाच्या संजय कुमार आणि के विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने म्हटलं की, ''अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनौ खंडपीठाने या प्रकरणातील आरोपींना जामीन मंजूर करताना त्या आरोपींची गुन्ह्यातील सक्रिय भूमिका, त्यांचा गुन्हेगारी इतिहास आणि वारंवार असेच गुन्हे करण्याची प्रवृत्ती यासारख्या बाबींचा विचार केला नाही.''

सर्वोच्च न्यायालयाने पुढे म्हटलं की, ''जरी पूर्वीचे निकाल हिंसक गुन्ह्यांच्या संदर्भात होते. पण तरीही त्यातील तत्त्व आर्थिक फसवणुकीसारख्या प्रकरणांमध्ये देखील लागू होतात. कारण जिथे लोकांचे कष्टाने कमावलेले पैसे हिरावले जातात. यामध्येच हा खटला मोठ्या प्रमाणात फसवणूक, गुन्हेगारी, विश्वासघात आणि धमकीच्या आरोपांशी संबंधित आहे.''

निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
# आत्ताच एक्सप्रेस



## मूलभूत सुविधांचे संगीतही वाजू द्या

आकांक्षांचे प्रतीक आणि अभियांत्रिकी नैपुण्य यापुरती काही नवलाई आणायला हरकत नाही. परंतु ती सार्वत्रिक व मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष करून उभारावी का, हा प्रश्न आहे. मुंबईत सोन्याचा रस्ता तयार करण्याची तयारी सुरू आहे, तर भारतातील पहिला संगीतपथ मुंबईत छत्रपती संभाजी महाराज किनारा मार्गावर उभारण्यात आला आहे. या मार्गावरून ताशी ७० किमी वेगाने वाहन गेल्यास आतमध्ये 'जय हो'ची ऑस्करविजेती धून ऐकायला मिळत आहे. हा अभियांत्रिकी चमत्कार आहे, असे कौतुक काहीजण करताहेत; तर त्यांना मराठी गाणे मिळाले नाही का, असा प्रश्न मनसेने केला आहे. या परिसरातील इमारतींमधील रहिवाशांनी पहिल्या दोन दिवसांतच आपल्या घरापर्यंत सारखा कर्णकर्कश आवाज आदळतो आहे, अशा तक्रारी केल्या आहेत. पूर्वी लहान मुले पहिल्यांदा चालू लागली, की त्यांना त्याचे अप्रूप वाटावे, यासाठी वाजणारे बूट बाजारात आले होते. नव्याची नवलाई काही काळाने संपून जाते. या संगीतपथाचे तसे न होवो. कदाचित रागीट माणसाला शांत करणारे संगीत, भरधाव वाहन चालविणाऱ्यासाठी भीतीदायक गाणे, शास्त्रीय संगीताची आवड असणाऱ्यांना दिवसाच्या वेळेनुसार रागदारी, कुणासाठी तालवाद्य, तर कुणासाठी तंतुवाद्य असे प्रकारही येतील. आकांक्षांचे प्रतीक आणि अभियांत्रिकी नैपुण्य यापुरत्या नवलाईस हरकत नाही; परंतु ती सार्वत्रिक व मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष करून उभारावी का, हा प्रश्न आहे. इतर अनेक ठिकाणचे रस्ते आयुष्याच्या भैरवीचीच धून वाजवत असताना असे एखाद्या ठिकाणी चकचकीत मुलामा देऊन काय साधणार? मुंबईत गेटवे ऑफ इंडियाच्या वास्तूपासून सी लिंक पुलावरील कमानीवर होणारी रोषणाई, रेल्वे स्टेशनासमोरची दर्शक गॅलरी अशा अनेक वास्तू या आकर्षण ठरल्या आहेत; परंतु ५०० मीटरच्या रस्त्यावर गाणे लावल्याने इतर दोन हजार किलोमीटरच्या रस्त्यांच्या दुरवस्थेचे दुःख दूर कसे करणार? मुंबईत कोणत्या रस्त्यावरून ताशी ७० किलोमीटरने सुरक्षितपणे गाणी ऐकत जाता येते? एकसमान पोत, समतल प्रमाण असा रस्ता शोधावा लागतो. सुमारे २० वर्षांपूर्वी मुंबईत पेव्हर ब्लॉक्सची लाट आली. काही नेतेमंडळींनी पेव्हर ब्लॉक्सच्या उत्पादनाचे कारखाने उभारले. चौकाचौकात पेव्हर ब्लॉक लागले. पाच-सहा वर्षांपूर्वी महापालिकेला जाग आली आणि मग हे पेव्हर ब्लॉक काढून ती लेन डांबराची करण्याचे प्रयत्न झाले. तोपर्यंत हा अर्धा रस्ता हातातून गेलेला होता. कुपरिचित मुंबई-गोवा महामार्गावर पळस्पे ते वडखळ ते नागोठणे किंवा अलिबागपर्यंतच्या रस्त्यावर २० गतिरोधक असतील, तर त्यात किमान २० प्रकार आढळतील. कोणत्याही गतिरोधकाच्या आधी पूर्वसूचना देणारे फलक नाहीत. ठाण्यामध्ये शिरताना महामार्गावर प्रवेशद्वारापाशी सुंदर दीपमाळा उभ्या केल्या; परंतु दोन्ही बाजूंना जोडणाऱ्या पादचारी पुलांची स्थिती भंगारापेक्षा वाईट असते. मध्यंतरी पूर्व द्रुतगती महामार्गावर रोषणाई करण्यासाठी फुलपाखरांच्या नक्षीचे खांब उभे करण्यात आले. गोदीकडे जाणाऱ्या पी. डिमेलो मार्गावर नक्षीकाम केलेले प्राचीन दिव्यांचे खांब उभारम्यात आले. या सर्वांची दुरवस्था झाली आहे, तर महामुंबईभर आजही कित्येक ठिकाणी रात्री रस्त्यावर दिवाबत्तीची सोय नसते. कोणत्या महापालिकेने वीजबिलभरणा करायचा, यावरून घोडे अडते. ठाण्यात जुने ठाणे, नवे ठाणे नावाने एक संकल्पनाआधारित उद्यान उभारण्यावर ३८ कोटी रुपयांची उधळपट्टी झाली, ते 'महाराष्ट्र टाइम्स'ने उजेडात आणले होते. त्यावर चौकशी समित्या, वगैरे झाल्या; परंतु शिक्षा कुणालाही झाली नाही, कुणाच्याही खिशातून या भुर्दंडाची वसुली झाली नाही. स्कायवॉक, सायकलट्रॅक, मोनोरेल्वे अशी उधळपट्टीची उदाहरणे तर बरीच देता येतील. प्रश्न असा आहे, की राजकारणी आणि नियोजनकर्त्यांना सुविधा उभारताना जे काही संगीत वाजवायचे आहे, ते धनिकांच्या अवतीभवती. एखादा अटलसेतू, एखादा सी लिंक, किनारामार्ग चकचकीत करायचा. बाकी मुंबईकरांचे रस्ते कसे का असेनात . मुंबईतील ६३ टक्के रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण पूर्ण झाले आहे, असे जाहीर करण्यात आले आहे. त्यांचे जोडकाम योग्यरीत्या होत नाही, ही समस्या आहे. रस्त्याखाली संगीत वाजविण्याची किमया जर आपले अभियंते साधू शकतात, तर समतल रस्ते का देऊ शकत नाहीत?

## छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त विशेष कविता



''माजा शिवबा तु''
स्वराज्य संकल्पनेचा धागा तु,
जिजाऊंच्या संस्कारांचा सार तु,
शूरवीर तु, कर्मवीर तु, धर्मवीर ही तूच,
युद्धभूमीच्या मातीचा सुगंध ही तूच,
माजा शिवबा तु, माजा शिवबा तु।।

युद्ध नीतीचा धुरंधर तु,
पराक्रमाची खाण तु,
साहसी वीरांचा ध्यास तु,
रयतेच्या स्वप्नांचा श्वास तु,
माजा शिवबा तु, माजा शिवबा तु।।

रणांगणात विरांची प्रेरणा तु,
रणांगणात विरांची ढाल तु,
रणांगणात शत्रूच्या मनातील भय तु,
रणांगणात समशेर भवानीची धार तु,
माजा शिवबा तु, माजा शिवबा तु।।

स्त्री सन्मानाचा संकल्पक तु,
शेतकर्यांचा व बहुजनांचा कैवारी तु,
संयमाचा व शिस्तीचा महामेरू तू,
थकलेल्यांचा आधार तू, हरलेल्यांची प्रेरणा तु,
माजा शिवबा तु, माजा शिवबा तु।।

या महाराष्ट्राचा सन्मान तू,
अखंड हिंदुस्थान चा अभिमान तु,
केवळ भगव्याचीच नाही तर या तिरंग्याची शान तु,
या तिरंग्याची शान तु,
माजा शिवबा तु, माजा शिवबा तु।।

**– प्रा. डॉ. बस्वराज लक्षटे,**
आदर्श महाविद्यालय,
हिंगोली.

***

# रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज



रणभूमीवर आग फेकतो,
जणू तोफेचा गोळा,
शत्रूलाही धडकी भरवतो,
हा शिवबाचा मावळा !!
महाराष्ट्र भूमीत जन्म घेतला,
अभिमान उरी आगळा !
शिवचरणावर निष्ठा अर्पितो, हा शिवरायांचा मावळा !!

सर्वप्रथम शिवरायांच्या चरणी कोटी कोटी नमन.

मध्ययुगीन पारतंत्र्याचा, गुलामगिरीचा काळोख दूर करण्यासाठी या दख्खन प्रांतात, महाराष्ट्राच्या मातीत एका तेजस्वी सूर्याचा जन्म झाला आणि तो तेजस्वी सूर्य म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराज होत. शिवतेज्याच्या, स्वातंत्र्यसूर्याच्या स्वराज्य प्रेरिका, राष्ट्रमाता, जिजाऊ या त्यांच्या माता तर स्वराज्य संकल्पक शहाजीराजे हे त्यांचे पिता होत. शहाजीराजे आणि राष्ट्रामता जिजाऊ यांच्या पोटी १९ फेब्रुवारी इ.स.१६३० मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म शिवनेरी या किल्ल्यावर झाला. स्वराज्य संरक्षक, रयतेचा राजा, कुळवाडी भूषण, शिवाजी महाराज यांची जयंती दरवर्षी १९ फेब्रुवारीला साजरी केली जाते. १८६९ साली महात्मा फुले यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची रायगड येथील समाधी शोधून काढली व त्यांच्या जीवनावर सर्व प्रथम प्रदीर्घ पोवाडा लिहिला. रायगडावरील शिवाजी महाराजांच्या समाधीची व्यवस्था सरकारने स्वतःकडे घ्यावी असा अर्ज ज्योतिबा फुल्यानी केला होता. १८७० साली महात्मा फुले यांनी पुणे येथे पहिली शिवजयंती साजरी करून जनसामान्यामध्ये शिवराय रुजले पाहिजे, त्यांच्या कार्याचा संबंध महाराष्ट्राला दर्शन घडावे असा हेतू यामागे महात्मा फुल्यांचा होता.

शिवरायांच्या जन्मानंतर त्यांच्या डोळस जडणघडणीकडे माँ जिजाऊ आणि शहाजीराजे यांनी विशेष लक्ष दिले आपल्या माता पित्याकडून शिवरायांना राज्यकारभार, युद्धतंत्र, प्रजापालन, नैतिकतेचे संस्कार, पुस्तकी शिक्षणाबरोबरच राजकीय, लष्करी, भौगोलिक शिक्षणाची व्यवस्था इत्यादी गुण प्रदान केल्या गेले. शिवनेरीच्या अंगा खांद्यावर खेळताना सह्याद्रीच्या कुशीत निर्भयपणे वावरायला शिकविले. शिवरायांच्या ठायी स्वातंत्र्य आणि स्वराज्याच्या स्वप्नाची प्रेरणाच करण्यात आली जेणेकरून मध्ययुगीन, अंधार युगामध्ये स्वतंत्र रयतेचे राजे स्थापन व्हावं यासाठी सर्वच बालशिक्षण आपल्या मातापित्याकडून त्यांना मिळाले. छत्रपती शिवाजी महाराज ज्या काळात होऊन गेले तो काळ मध्ययुगीन काळ, त्याकाळी सर्वत्र राजेशाहांचा अमल असे, त्याकाळी सुद्धा राजे प्रजेच्या हिताएवजी आपल्याच सैन्य विलासात मग्न असत. पण शिवरायांनी स्वतःचे स्वराज्य निर्माण करून रयतेला, प्रजेला सुखी करण्याच महान कार्य केले म्हणून त्यांना रयतेचा राजा म्हटल्या गेले.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवजयंतीचे अध्यक्ष स्थान भूषवून अध्यक्षीय भाषण केले, आपल्या वेगवेगळ्या लिखाणा मधून अग्रलेखांमधून, आर्टिकल मधून, रायगड येथील समाधीला भेट, असे एक ना अनेक संदर्भ शिवरायांच्या गौरवा बद्दल आढळतात. छत्रपती शिवरायांनी स्वराज्याची निर्मिती केली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्याचे बळकटीकरण करून लोकशाहीत रूपांतर केले. असे ह्या दोन्ही महामानवांनी स्वराज्याची, लोकशाहीची मुहूर्तमेढ रोवली.

शिवरायांनी परस्त्रीचा सन्मान कसा करावा याचे एक उदाहरण युद्धाच्या काळात शत्रू पक्षाच्या स्त्रिया किंवा मुले यांना कोणत्याही प्रकारची इजा करता कामा नये, उलट त्यांना अतिशय मनाने वागणूक देण्याचे हुकूम महाराजांनी दिले होते, त्यांनी स्वतः अनेकदा आपल्या वर्तनातून स्त्रियांना मानाने कसे वागवावे याचे आदर्श घालून दिलेले आढळतात. कर्नाटकातील बेलवडी येथील मलम्मा देसाई तिच्या पराक्रमाची बातमी शिवरायांना समजली तेव्हा त्यांनी मलम्माला आपली धाकटी बहीण म्हणून तिला सावित्री हा किताब देऊन तिचा सन्मान केला एवढे उदात्त स्त्री विषयक विचार शिवरायांना बालवयतच आपल्या मातेकडूनच संस्कार मिळाले होते. शिवराय साधु संतांना फार मान देत असत त्यांना मंदिरे प्रिय होती. त्यांनी मशिदींचेही रक्षण केले त्यांनी कुराण शरीफचा ही मान राखला. ख्रिस्ती लोकांच्या प्रार्थना मंदिरांनाही ते जपत. शिवराय विद्वानांचा आदर करत परमानंद गागाभट्ट, धुंडीराज, भूषण इत्यादी विद्वानांचा हाताने सत्कार केला तसेच संत तुकाराम, बाबा याकुत, मौनीबाबा यांचाही त्यांनी बहुमान केला.

शिवरायांनी संत तुकारामाच्या या अभंगातील ओळींचा

'' जे का रंजले गांजले ! त्यासी म्हणी जो आपुले !
तोचि साधू ओळखावा ! देव तेथेची जाणावा!''

आपल्या रयतेसाठी, स्वराज्याच्या जनतेसाठी केला.

आदर्श पुत्र, सावध नेता, कुशल संघटक, लोक कल्याणकारी प्रशासक, हिकमती लढवय्या, दुर्जनांचा कर्दनकाळ, सज्जनांचा कैवारी, आणि एक नव्या युगाचा निर्माता, असे शिवरायांच्या व्यक्तिमत्त्वाचे कितीतरी तेजस्वी पैलू आहेत हे सारे पाहिले की पुन्हा पुन्हा वाटते –

शिवरायांचे आठवावे रूप !
शिवरायांचा आठवावा प्रताप !
शिवरायांचा आठवावा साक्षेप भूमंडळी.

अशाप्रकारे छत्रपती शिवरायांनी वेगवेगळ्या पद्धतीने विविध पैलूंवर विविध युक्त्या, कलरूप्त्या वापरून स्वराज्य निर्माण केले आणि रयतेला लोककल्याणकारी बनवले म्हणून आता दुसरे शिवराय होणे नाही त्यामुळे छत्रपती शिवरायांना सर्वांनी अंगीकारले पाहिजे, आत्मसात केले पाहिजे.

**–प्रा. प्रकाश यादवराव पतंगे**
शिवाजी महाविद्यालय,
हिंगोली.

# छत्रपती शिवाजी महाराज : भारतीय राष्ट्रवादाचे आद्य प्रतीक

भारतीय इतिहासाच्या अभ्यासात छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्थान केवळ एका पराक्रमी योद्ध्यापुरते मर्यादित ठेवणे ही एक मोठी बौद्धिक मर्यादा ठरेल. आधुनिक इतिहासलेखन, समाजशास्त्र आणि राज्यशास्त्र यांच्या दृष्टीने पाहिले असता शिवाजी महाराज हे एक राज्यसंस्थापक, लोककल्याणकारी प्रशासक, धर्मनिरपेक्ष दृष्टी असलेले नेतृत्व आणि भारतीय राष्ट्रवादाचे आद्य प्रतीक म्हणून समोर येतात. म्हणूनच १९ फेब्रुवारी रोजी साजरी होणारी शिवजयंती ही केवळ स्मृतिदिन नसून भारतीय राज्यसंस्थेच्या ऐतिहासिक मुळांचा पुनर्विचार करण्याची संधी आहे.

सतराव्या शतकातील भारताची राजकीय परिस्थिती अत्यंत अस्थिर होती. मुघल साम्राज्याचे केंद्रीकरण, दख्खनमधील आदिलशाहीकुतुबशाही यांचे संघर्ष, सरंजामी शोषण आणि धार्मिक-सामाजिक असुरक्षितता यांमुळे सामान्य जनता भयग्रस्त होती. अशा पार्श्वभूमीवर शिवाजी महाराजांचा उदय हा केवळ सत्तांतर नव्हता, तर राज्याच्या स्वरूपातच मूलभूत परिवर्तन घडवणारा होता. त्यांच्या स्वराज्याची संकल्पना ही परकीय सत्तेविरोधातील प्रतिक्रिया नव्हे, तर स्वतःच्या लोकांसाठी स्वतःचे राज्य उभारण्याची सकारात्मक राजकीय दृष्टी होती.

इतिहासकार जदुनाथ सरकार, गोविंद सखाराम सरदेसाई, जेम्स लेन, स्टीवर्ट गॉर्डन यांसारख्या अभ्यासकांनी आपल्या लेखनात शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाचे विविध पैलू अधोरेखित केले आहेत. आधुनिक संशोधनानुसार, शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे लोकसंमतीवर आधारित, नैतिक अधिष्ठान असलेले आणि प्रशासकीय शिस्तीवर उभे असलेले राज्य होते. ''हे राज्य रयतेचे आहे'' हा विचार केवळ घोषणात्मक नव्हता, तर महसूल व्यवस्था, न्यायव्यवस्था आणि संरक्षण धोरणांतून प्रत्यक्षात उतरवला गेला होता.

शिवाजी महाराजांच्या घडणीत जिजाऊ मातेचे योगदान अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. जिजाऊंच्या धार्मिक-नैतिक संस्कारांतून महाराजांमध्ये धर्मभावना निर्माण झाली, पण ती संकुचित नव्हती. रामायण-महाभारत, संत परंपरा आणि लोककथा यांमधून त्यांनी कर्तव्य, न्याय आणि लोकहित यांचे मूल्य आत्मसात केले. शहाजी राजांच्या अनुभवातून त्यांनी तत्कालीन राजकारणाची गुंतागुंत समजून घेतली. त्यामुळे शिवाजी महाराजांचे नेतृत्व भावनिक नसून विवेकाधिष्ठित होते.

स्वराज्याची उभारणी करताना शिवाजी महाराजांनी स्थानिक शक्तींना संघटित केले. मावळ प्रदेशातील शेतकरी, स्थानिक सरदार, कारागीर आणि सामान्य सैनिक हे स्वराज्याचे आधारस्तंभ होते. ही प्रक्रिया आधुनिक राज्यशास्त्रात सांगितल्या जाणाऱ्या सहभागी शासन संकल्पनेशी सुसंगत आहे. त्यामुळेच स्वराज्याला व्यापक सामाजिक पाठिंबा मिळाला. लोकांनी ते आपले राज्य मानले, हीच त्याच्या यशाची गुरुकिल्ली ठरली.

लष्करी दृष्टिकोनातून पाहिले असता, शिवाजी महाराजांनी स्वीकारलेली गनिमी काव्याची रणनीती ही केवळ युद्धतंत्र नव्हती, तर ती संसाधन-मर्यादेतून निर्माण झालेली बुद्धिमान रणनिती होती. भूगोलाचा अचूक वापर, वेग, गोपनीयता आणि स्थानिक पाठिंबा यांच्या जोरावर त्यांनी बलाढ्य सैन्यांना पराभूत केले. मात्र महत्त्वाचे म्हणजे, युद्धातील नैतिकता त्यांनी कधीही सोडली नाही. स्त्रिया, मुले, वृद्ध आणि धर्मस्थळे यांना अभय देण्याची त्यांची भूमिका आधुनिक आंतरराष्ट्रीय मानवीय कायद्यांच्या तत्त्वांशी सुसंगत वाटते.

शिवाजी महाराजांचे प्रशासन हा त्यांच्या अभ्यासाचा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. अष्टप्रधान मंडळाच्या माध्यमातून त्यांनी कारभाराचे विकेंद्रीकरण केले. पंतप्रधान, अमात्य, सुमंत, सचिव, सेनापती, न्यायाधीश, पंडितराव यांसारखी पदे निर्माण करून त्यांनी कार्यविभागणी व उत्तरदायित्व निश्चित केले. महसूल व्यवस्था शेतकरीकेंद्रित होती. जमिनीचे मोजमाप, पीकपद्धतीनुसार कर आकारणी आणि आपत्तीच्या काळात सवलती देणे ही धोरणे लोककल्याणकारी राज्याची लक्षणे मानली जातात.

धर्मनिरपेक्षतेच्या संदर्भात शिवाजी महाराजांचे स्थान विशेष आहे. त्यांच्या काळात धर्माधारित संघर्ष सामान्य होते, तरीही त्यांनी धार्मिक सहिष्णुतेची भूमिका घेतली. मशिदींचे संरक्षण, कुराणाचा सन्मान आणि मुस्लिम अधिकाऱ्यांना महत्त्वाची पदे देणे यावरून त्यांची भूमिका स्पष्ट होते. त्यामुळे शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे धर्माधिष्ठित नसून नैतिक अधिष्ठान असलेले राज्य होते, असे आधुनिक इतिहासलेखन मानते.

स्त्रीसन्मानाच्या दृष्टीने शिवाजी महाराजांचा दृष्टिकोन त्यांच्या काळाच्या खूप पुढचा होता. इतिहासकारांच्या नोंदींनुसार, स्त्रीवर अत्याचार करणाऱ्यांना कठोर शिक्षा देण्यात येत असे. युद्धात जिंकलेल्या स्त्रियांना सन्मानाने परत पाठवले जाई. ही भूमिका तत्कालीन सामंती मानसिकतेच्या पूर्ण विरोधात होती. त्यामुळे शिवाजी महाराजांना स्त्रीसन्मानाचे आद्य पुरस्कर्ते मानले जाते.

राज्याभिषेक हा शिवाजी महाराजांच्या जीवनातील एक निर्णायक टप्पा होता. तो केवळ धार्मिक विधी नव्हता, तर सार्वभौम भारतीय राज्याची औपचारिक घोषणा होती. परकीय सत्तांच्या छायेतून बाहेर पडून स्वराज्याला वैधता देणारा हा क्षण होता. राज्याभिषेकानंतर स्वराज्याची प्रशासकीय रचना अधिक सुसंगत आणि संस्थात्मक झाली.

शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाचे आकलन केवळ युद्ध आणि प्रशासनापुरते मर्यादित ठेवणे अपुरे ठरेल. त्यांच्या राज्यकारभाराचा एक अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे कूटनीती. सतराव्या शतकातील भारतीय राजकारण हे सतत बदलणाऱ्या सत्ता-समीकरणांनी व्यापलेले होते. मुघल, आदिलशाही, कुतुबशाही, स्थानिक सरदार आणि परकीय व्यापारी शक्ती यांच्यातील संबंध गुंतागुंतीचे होते. अशा परिस्थितीत शिवाजी महाराजांनी संघर्ष, तह, संधी आणि प्रतिकार यांचा समतोल साधत स्वराज्याचे हित जपले. आधुनिक आंतरराष्ट्रीय संबंध सिद्धांतात ज्याला 'रियलपोलिटिक' म्हटले जाते, त्याचे आद्य स्वरूप त्यांच्या धोरणांत आढळते.

महाराजांनी शत्रूशीही गरज पडल्यास तह केले, परंतु स्वराज्याच्या स्वायत्ततेवर कधीही तडजोड केली नाही. आग्रा भेटीसारख्या प्रसंगात त्यांची राजकीय सूक्ष्मदृष्टी आणि मानसिक धैर्य स्पष्टपणे दिसून येते. इतिहासकारांच्या मते, आग्र्यातील कैदेतून सुटका ही केवळ धाडसी पलायन नव्हते, तर मुघल सत्तेच्या नैतिक व राजकीय मर्यादांचे भान देणारा प्रसंग होता. या घटनेनंतर शिवाजी महाराजांची प्रतिमा केवळ प्रादेशिक राजापेक्षा व्यापक बनली.

मराठा साम्राज्याचा विस्तार हा शिवाजी महाराजांच्या वैचारिक वारशाचा परिणाम होता. त्यांनी निर्माण केलेली प्रशासनिक चौकट, लष्करी शिस्त आणि लोकाभिमुख धोरणे यांमुळे पुढील पिढ्यांना साम्राज्य विस्ताराची दिशा मिळाली. छत्रपती संभाजी महाराज, राजाराम महाराज आणि पुढे पेशवाई काळातील नेतृत्वाने शिवाजी महाराजांच्या संकल्पनांना पुढे नेले. तथापि, इतिहासकार हेही अधोरेखित करतात की शिवाजी महाराजांचे वैयक्तिक नेतृत्व आणि नैतिक अधिष्ठान हे अद्वितीय होते, ज्याची पुनरावृत्ती पुढील काळात तशीच्या तशी झाली नाही.

ब्रिटिश कालखंडात शिवाजी महाराजांची प्रतिमा नव्याने घडवली गेली. औपनिवेशिक इतिहासलेखनात सुरुवातीला त्यांना ''बंडखोर सरदार'' म्हणून दाखवण्याचा प्रयत्न झाला. मात्र भारतीय राष्ट्रवादी इतिहासकारांनी या दृष्टिकोनाला आव्हान दिले. लोकमान्य टिळकांनी शिवाजी जयंती आणि गणेशोत्सव सार्वजनिक करून शिवाजी महाराजांना राष्ट्रीय प्रेरणास्थान बनवले. विनायक दामोदर सावरकर, महात्मा फुले, राजाराम मोहन रॉय यांसारख्या विचारवंतांनी शिवाजी महाराजांच्या स्वराज्यसंकल्पनेला आधुनिक स्वातंत्र्य चळवळीशी जोडले.

आधुनिक भारतीय राष्ट्रवादाच्या अभ्यासात शिवाजी महाराजांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांच्या स्वराज्याची संकल्पना ही केवळ राजकीय स्वातंत्र्यापुरती मर्यादित नव्हती, तर ती सांस्कृतिक, सामाजिक आणि नैतिक स्वातंत्र्याशी जोडलेली होती. ब्रिटिश सत्तेविरोधातील लढ्यात ''स्वराज्य'' हा शब्द पुन्हा केंद्रस्थानी आला, याचे मूळ शिवाजी महाराजांच्या विचारांत आढळते. त्यामुळेच त्यांना भारतीय राष्ट्रवादाचे आद्य प्रतीक मानले जाते.

शिवाजी महाराजांचा धर्मविषयक दृष्टिकोन आधुनिक भारतासाठी विशेष संदर्भात्मक ठरतो. आजच्या बहुधर्मीय, बहुसांस्कृतिक समाजात धार्मिक सहिष्णुता आणि परस्पर आदर ही मूल्ये अत्यंत आवश्यक आहेत. शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यकारभारातून ही मूल्ये प्रत्यक्षात उतरवली. त्यांच्या काळातील राजकीय वास्तव पाहता ही भूमिका अधिकच महत्त्वाची ठरते. म्हणूनच आधुनिक राज्यशास्त्रात त्यांना 'सर्वसमावेशक शासक' म्हणून पाहिले जाते. स्त्रीसन्मानाच्या संदर्भात शिवाजी महाराजांचे विचार आजच्या लिंगसमतेच्या चर्चेतही मार्गदर्शक ठरतात. स्त्रीला केवळ संरक्षण नव्हे, तर सन्मान देण्याची त्यांची भूमिका सामाजिक परिवर्तनाची बीजे पेरणारी होती. आधुनिक स्त्रीवादी अभ्यासकांच्या मते, शिवाजी महाराजांची भूमिका ही तत्कालीन पितृसत्ताक व्यवस्थेच्या चौकटीत राहूनही प्रगत होती. प्रशासनशास्त्राच्या दृष्टीने शिवाजी महाराजांचे राज्य हे कल्याणकारी राज्याच्या प्राथमिक संकल्पनेशी सुसंगत वाटते. महसूल सवलती, आपत्ती व्यवस्थापन, न्याय्य करप्रणाली आणि लोकाभिमुख न्यायव्यवस्था ही वैशिष्ट्ये आधुनिक कल्याणकारी राज्याच्या मूलतत्त्वांशी जुळणारी आहेत. त्यामुळे शिवाजी महाराजांचे राज्य हे केवळ ऐतिहासिक नव्हे, तर सैद्धांतिक अभ्यासासाठीही महत्त्वाचे ठरते.

आजच्या भारतात शिवाजी महाराजांचे स्मरण अनेकदा भावनिक किंवा राजकीय पातळीवर मर्यादित राहते. मात्र शैक्षणिक दृष्टीने पाहिले असता त्यांच्या विचारांचा सखोल अभ्यास करण्याची गरज आहे. अभ्यासक्रम, संशोधन आणि सार्वजनिक चर्चांमध्ये शिवाजी महाराजांना केवळ योद्धा म्हणून नव्हे, तर राज्यसंस्थापक, प्रशासक आणि सामाजिक सुधारक म्हणून मांडणे आवश्यक आहे. यामुळे इतिहासाचे अधिक समतोल आणि वैज्ञानिक आकलन विकसित होईल.

जागतिक इतिहासाच्या संदर्भात पाहिले असता, शिवाजी महाराजांची तुलना युरोपमधील राष्ट्रनिर्मात्यांशी करता येते. त्यांनी उभारलेले स्वराज्य हे स्थानिक परिस्थितीतून उगम पावलेले असले तरी त्यातील मूल्ये सार्वकालिक आहेत. स्वातंत्र्य, न्याय, लोककल्याण आणि नैतिक नेतृत्व ही मूल्ये कोणत्याही काळात आणि कोणत्याही समाजात उपयुक्त ठरतात.समारोप करताना असे म्हणता येईल की छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ मराठा इतिहासाचे नव्हे, तर संपूर्ण भारतीय इतिहासाचे केंद्रीय व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांच्या स्वराज्याची संकल्पना ही आधुनिक भारतीय राज्यव्यवस्थेची वैचारिक पूर्वपीठिका ठरते. १९ फेब्रुवारी रोजी साजरी होणारी शिवजयंती ही केवळ गौरवाचा उत्सव नसून आत्मपरीक्षणाची संधी आहे. त्यांच्या विचारांकडे केवळ अभिमानाने नव्हे, तर अभ्यासपूर्ण दृष्टीने पाहिले तरच आपण त्यांच्या वारशाशी प्रामाणिक राहू शकतो. शिवाजी महाराजांचा वारसा म्हणजे तलवारीचा नव्हे, तर विचारांचा; सत्तेचा नव्हे, तर सेवेचा; विजयाचा नव्हे, तर मूल्यांचा वारसा आहे. आधुनिक भारताच्या लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक न्यायाच्या संकल्पनांत त्यांच्या स्वराज्याचा प्रतिध्वनी ऐकू येतो. म्हणूनच शिवाजी महाराज इतिहासात बंदिस्त न राहता आजही वर्तमानाशी संवाद साधतात आणि भविष्याला दिशा देतात.

**– डॉ. राजेंद्र बगाटे**
लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक

***

# पुसेगाव येथे 'गर्भ कल्याणक' सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न



**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** सेनगाव तालुक्यातील पुसेगाव येथे आंतरराष्ट्रीय पंचकल्याणक महोत्सवा निमित्त बुधवार, १८ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित 'गर्भ कल्याणक' सोहळा विविध धार्मिक विधींसह भक्ति भावात संपन्न झाला. पहाटेपासूनच मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी उसळली होती आणि संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

सकाळी ५.३० वाजता मंगलाष्टक, नित्य अभिषेक, शांतिधारा, देव–शास्त्र–गुरु आज्ञा अर्ध्यर्पण या विधींनी कार्यक्रमाची सुरुवात झाली. ८१ कलशांच्या भव्य घटयात्रेनंतर मुख्य पंचकल्याणक पंडालसमोर सकाळी ८.३० वाजता ध्वजारोहण पार पडले. मंडप उद्धाटन, पंडाल शुद्धी, सकळीकरण, अंकुरारोपण, शांती होम, इंद्र प्रतिष्ठा, कंकण बंधन, श्रीजी अभिषेक व शांतिधारा हे विधी विधिवत पार पडले. पूज्य आचार्य श्री यांच्या मंगल प्रवचनाने उपस्थितांना आध्यात्मिक मार्गदर्शन लाभले. दहा दिशांमध्ये ध्वज स्थापना विधीही करण्यात आली. दुपारी १.०० वाजता याग मंडळ विधान व भगवान बाहुबली यांच्या साक्षीने नवग्रह आराधना भाविकांच्या उपस्थितीत पार पडली.

सायंकाळी ६.४५ वाजता गुरु भक्ति, आरती, जप, भेरी ताडन, अष्टकुमारिका आह्वान, गर्भकल्याणक क्रिया, मेहंदी तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी वातावरण अधिकच भारावून गेले. इंद्र सभा, तत्वचर्चा, इंद्रासन कंपायमान, रत्नवृष्टि आणि स्वप्न दर्शन या कार्यक्रमांनी भाविकांना विशेष आध्यात्मिक अनुभूती दिली.

या कार्यक्रमस्थळी आमदार तानाजीराव मुटकुळे यांनी भेट देऊन सोहळ्याची पाहणी केली. त्यांनी जैन समाज बांधवांशी संवाद साधत आयोजन समितीच्या कार्याचे कौतुक केले व महोत्सवासाठी शुभेच्छा दिल्या. या सोहळ्यासाठी परिसरातील तसेच बाहेरगावाहून मोठ्या संख्येने जैन समाज बांधव, ग्रामस्थ व भाविक उपस्थित होते. आयोजन समितीने केलेल्या नियोजनाबद्दल सर्वत्र समाधान व्यक्त करण्यात आले.

# हिंगोलीत "शिवशंभो" प्रतिष्ठानची स्थापना !; प्रथमच शिवशंभो गौरव पुरस्काराची घोषणा



**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** जिल्हात सामाजिक एकता व समता जोपासण्यासाठी शिवजन्मोत्सवाच्या निमित्ताने आज दि.१९ फेब्रुवारी रोजी बुधवारी "शिवशंभो" प्रतिष्ठानची स्थापना करण्यात आली येणार आहे. प्रतिष्ठानच्या वतीने प्रथमच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांना शिवशंभो पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

नुकतीच शिवशंभो गौरव पुरस्कार निवड समिती प्रमुख प्राचार्य पवन सोळंके, साहित्यिक अशोक अर्धापूरकर, नामदेव वाबळे ,ऍड शेषराव पतंगे, ऍड साहेबराव शिरसाट, पत्रकार राजेश दारव्हेकर, मिराताई कदम यांचा समावेश असलेल्या समितीने विविध क्षेत्रात महत्वपूर्ण योगदान असणाऱ्याची समितीने शिवशंभो गौरव पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. ती पुढील प्रमाणे शिवशंभो विशेष गौरव पुरस्कार कृषि क्षेत्र सुरेशसिंग चंदनसिंग ठाकूर दांडेगाव ता. कळमनुरी,साहित्य क्षेत्र कलानंद जाधव हिंगोली,सामाजीक क्षेत्र महेश गणपतराव खुळखुळे औंढा नागनाथ,क्रिडा क्षेत्र सनी विठ्ठलराव पंडित हिंगोली,शिक्षण क्षेत्र गजानन नामदेव पायघन सेनगाव, उद्योग क्षेत्र रमेश संभाजी पंडित हिंगोली यांना जाहीर झाल्याची घोषणा पुरस्कार निवड समितीने केली आहे यावेळी शिवशंभो प्रतिष्ठानचे कल्याण देशमुख, गजानन मगर,उमेश नागरे,ॲड. रावन धाबे, ज्योती धुळे, ज्ञानेश्वर चव्हाण , डॉ. नामदेव कोरडे,सदाशिव सुर्यतळ, डॉ. गजाला यास्मीन, मनोज देशमुख , प्रा. नंदकुमार संवडकर,सुनील पाठक,विजय गुंडेकर,शैलेश नांदेडकर, प्रा. गोपाल भोस यांची उपस्थिती होती. "शिवशंभो" गौरव पुरस्कारस्थीचा सन्मान करण्यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करून पुढील तारीख लवकरच जाहीर करण्यात येईल.



# जिन माता नगरच्या सुशोभीकरणासाठी ९० लाखांचा निधी कामाचे थाटात उद्घाटन

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** शहरातील प्रभाग क्रमांक १६, जिन माता नगर येथील नागरिकांची प्रदीर्घ प्रतीक्षा आता संपली आहे. जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या ९० लक्ष रुपये निधीतून ओपन स्पेसमध्ये संरक्षण भिंत बांधणे आणि सुशोभीकरण करण्याच्या कामाचे भूमिपूजन आज मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले.न प गटनेते श्रीराम बांगर,नगरसेवक श्यामभाऊ कदम, नगरसेवक निधीताई गोरे.रत्नाकर उर्फ खल्ली बांगर, सुमित कांबळे, गणेश बांगर.दिनकर गंगावणे, गणेश गंगावणे, जाधव काका, तानाजी सांगळे, समाधान चव्हाण, संतोष राठोड, राहुल घुगे, राहुल बांगर, अरुण गंगावणे, केंद्रे सर, जाधव सर आणि गादेकर आदी उपस्थित होते.

# शिवजयंती निमित्त आयोजित वक्तृत्व स्पर्धेला उस्फुर्त प्रतिसाद, आज पारितोषिक वितरण



**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** येथील सार्वजनिक छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजित वक्तृत्व स्पर्धेचे उद्धाटन समितीच्या अध्यक्षा सुनीताताई मुळे, समिती मार्गदर्शक खंडेराव सरनाईक,त्र्यंबक लोंढे, ऍड. उल्हास पाटील नगरसेविका वैशाली गोटे यांच्या हस्ते करण्यात आले.

सार्वजनिक छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समितीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात दिं १८ फेब्रुवारी बुधवार रोजी सकाळच्या सत्रात वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली या कार्यक्रमाच्या उद्धाटन प्रसंगी जयंती मंडळाच्या सचिव रजनी पाटील,उपाध्यक्षा विद्या पवार, अर्चना जाधव, कांताबाई कल्याणकर, अनिता सूर्यतळ, गायत्री मुळे, स्वाती भोयर,मनीष आखरे, ऐड.अमोल जाधव.डॉ. रमेश शिंदे अमोल,सोनू डांगे, हरिभाऊ मुटकुळे, प्रकाश इंगोले आदींसह शिवजयंती महोत्सव समितीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. शालेय विद्यार्थ्यांसाठी शिवाजी महाराज आमचे प्रेरणास्थान छत्रपती तर महाविद्यालयीन गटासाठी राष्ट्रविकासासाठी छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांची आवश्यकता या विषयावर स्पर्धा घेण्यात आली.

दोन्ही गटासाठी प्रत्येकी प्रथम पारितोषीक २ हजार रुपये व शिवचरित्र, द्वितीय १ हजार ५०० रुपये व शिवचरित्र, तृतीय १ हजार रुपये व शिवचरित्र, प्रोत्साहनपर ५०० रुपये व शिवचरित्र असे पारितोषीक देण्यात येणार आहे. पारितोषीक गायत्री परसराम मुळे यांच्यातर्फे देण्यात येणार आहे. दोन्ही गटातुन जवळपास १५० स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता.

सायंकाळी उशिरापर्यंत स्पर्धा सुरू होत्या विजय त्यांना शिवजयंतीच्या दिवशी दि.१९ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजता पारितोषिक वितरण केले जाणार आहे. स्पर्धा परीक्षक म्हणून नागनाथ सोळंके, प्रा.डॉ. बसवराज लक्षटे, डॉ. शोभा दुघाटे,गोदाटी काळे , अलोक बासरकर, मंजुषा चेंडके, आदींची उपस्थिती होती.

# गोदावरी अर्बनच्या १०० व्या शाखेचे अहमदाबाद गुजरात येथे उद्घाटन




**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** गोदावरी अर्बन वर ग्राहक ठेवीदारांनी टाकलेल्या विश्वासामुळे दिवसेंदिवस कार्याचा पल्ला पुढे सरकत आहे. गुजरातमधील अहमदाबाद येथे आज गोदावरी अर्बन मल्टी–स्टेट क्रेडिट को–ऑपरेटिव्ह सोसायटी लि.च्या १०० व्या शाखेचे उद्घाटन केंद्रीय सहकार तथा नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते करण्यात आले. या गौरवपूर्ण प्रसंगी हिंगोली लोकसभेचे माजी खासदार तथा बाळासाहेब ठाकरे हळदा संशोधन चे अध्यक्ष, कॅबिनेट दर्जा प्राप्त मंत्री आमदार हेमंत पाटील, माजी राज्यसभा खासदार जुगलजी ठाकूर, गुजरात स्टेट कॉपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष अजय पटेल, चेंबर ऑफ कॉमर्सचे सचिव सुधांशूजी मेहता, गुजरात कॉ–ऑप सोसायटीचे अध्यक्ष घनश्यामजी अमिन, भारत सरकार नियामक मंडळाचे अध्यक्ष डॉ. मनोजजी शर्मा, गोदावरी समूहाच्या अध्यक्ष सौ. राजश्रीताई पाटील, व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर, संचालक वर्षा देशमुख, साहेबराव मामिलवाड, अजय देशमुख सरसमकर यांच्यासह स्थानिक सल्लागार समितीचे सदस्य विशाल दुबे, मेरूबाई अलगोतर, हार्दिक नगार, रोहन हिरानी, भीष्म शहा, अनुज शहा, प्रवीण शहा व इतर मान्यवर उपस्थित होते. महाराष्ट्रातील उल्लेखनीय यशानंतर गोदावरी अर्बन बँकेने आपले जाळे थेट गुजरात ची राजधानी असलेल्या अहमदाबाद या शहरात पसरविल्याने या बँकेबद्दल असलेला ग्राहकांचा विश्वास या बँकेवर दिसत आहे.

दरम्यान गोदावरी समूहाचे अध्यक्ष श्रीमती राजश्रीताई हेमंतराव पाटील यांनी यावेळी महाराष्ट्र प्रमाणे सुद्धा गुजरातमध्ये आमची गोदावरी अर्बन बँक मोठ्या यशस्वीरित्या ग्राहकांचे मनी जिंकून जास्तीत जास्त ठेवी बचत गट त्यांची खाते तयार करून आग्रह कमी गुजरात मध्ये सुद्धा अग्रक्रम राहील अशी ग्वाही यावेळी बोलताना व्यक्त केली.

# भाजपा प्रदेश सरचिटणीस केनेकर यांचा भाजपा युवा मोर्चाचे पप्पू चव्हाण यांच्या हस्ते सत्कार



**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सरचिटणीस व विधानपरिषद आमदार संजय केनेकर यांची छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी हिंगोली जिल्हा भारतीय जनता युवा मोर्चाचे माजी जिल्हाध्यक्ष पप्पूभाऊ चव्हाण यांनी सदिच्छा भेट घेऊन संजय केनेकर यांचा भगवी शाल घालून पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला यावेळी बळसोंड ग्रामपंचायत चे माजी ग्रामपंचायत सदस्य सुमित घिके, ऋषिकेश पोले यांची उपस्थिती होती.



# एनटीसी महेश उद्यान सुशोभीकरण कामाचा थाटात शुभारंभ

## न.प. गटनेते श्रीराम दादा बांगर यांच्या हस्ते उद्घाटन

**आत्ताच एक्सप्रेस**

हिंगोली– हिंगोली येथील एनटीसी भागातील महेश उद्यान सुशोभीकरण कामाचा थाटात शुभारंभ शिवसेना न.प. गटनेते श्रीराम बांगर यांच्या हस्ते करण्यात आला एनटीसी भागातील या कार्यक्रम प्रसंगी स्थानिक नगरसेवक रत्नाकर (खली) बांगर आणि सुमित कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रभागातील नागरिकांच्या सोयीसाठी आणि शहराच्या सौंदर्यात भर टाकण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे.

नगरसेवक गणेश बांगर, राहुल बांगर,केशव दुबे, आशिष पोरवाल, मधुर भंसाळी, मुरली हेडा, शुभम मुंदडा, राजेश बालदि, रमेश झंवर, मयूर सोमाणी, अमित चांडक, गणेश काबरा, अंकित बगडिया, सुनील बगडिया, राजू कयाल, राजेश भंडारी,किरण कोंडेवार,महेश बियाणी, प्रवीण घुगे, दिनकर गंगावणे, एस.एम. गंगावणे, गणेश गंगावणे, कार्तिक चांडक, विवेक मालपाणी, संतोष बाहेती, संजय घन, अशोक डुब्बेवार, दिलीप झंवर, डॉ. अमोल धुमाळ, डॉ. आशोतोष माहूरकर, उमेश झंवर, पवन झंवर, पंकज रायसोनी, गजानन बांगर, आणि सचिन टाक आदींची या वेळी उपस्थित होते.

सुशोभीकरणामुळे एनटीसी परिसरातील ज्येष्ठ नागरिक आणि मुलांसाठी एक विरंगुळ्याचे उत्तम ठिकाण उपलब्ध होणार आहे. कार्यक्रमाला परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवछत्रपती गौरव पुरस्कार; विविध क्षेत्रातील जाधव, बबन शिंदे, सोनी, कदम, राजगुरू, प्राचार्य पंडित शिंदे यांचा समावेश

**आत्ताच एक्सप्रेस**



**हिंगोली–** हिंगोली येथील सार्वजनिक शिवछत्रपती जयंती उत्सव समितीतर्फे दिल्या जाणाऱ्या शिवछत्रपती गौरव पुरस्काराची घोषणा १८ फ ेब्रुवारी बुधवार रोजी पत्रकार परिषदेत करण्यात आली. कृषी, साहित्य , सामाजिक, क्रीडा, शिक्षण, उद्योग सेवेतील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सहा व्यक्तींना शिवजयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात पुरस्कारांनी मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे.

पुरस्कार समितीचे शिवाजीराव ढोकर पाटील, प्रा. विक्रम जावळे, प्रा. राजेश भालेराव, प्रा. विशाल शिंदे, सौ. डॉ. शितल कल्याणकर, सौ. प्रा. अंजली टापरे, नागेश सराफ, समन्वयक उल्हास पाटील, पंडित अवचार, हरिभाऊ मूटकुळे यांनी सहा पुरस्कारप्राप्त मान्यवरांची नावे जाहीर केली. यावेळी समितीच्या अध्यक्षा सुनीता मुळे, उपाध्यक्षा विद्या पवार, कार्याध्यक्षा स्वाती भोयर, कोषाध्यक्षा कांता कल्याणकर तसेच अनिता सुर्यतळ, उषा इंगोले,शिवाजीराव ढोकर पाटील, प्रा. विक्रम जावळे, खंडेराव सरनाईक, विकास शिंदे, डॉ. प्रल्हाद शिंदे, बाबाराव शृंगारे, प्रकाश इंगोले, शिवाजी मेटकर, ॲड दिलीप भाकरे, हरिभाऊ मूटकुळे, अनिता सुर्यतळ, उषा इंगोलेआदींची उपस्थिती होती.

कृषी क्षेत्रातला मानाचा पुरस्कार खानापूर चित्ता या. कळमनुरी येथील रामदास बळीराम जाधव यांना जाहीर झाला आहे. साहित्य क्षेत्रात कळमनुरी येथे बबन राघोजी शिंदे, सामाजिक क्षेत्रात हिंगोली येथील प्रकाशचंद्र सुभाषचंद सोनी, क्रिडा क्षेत्रात फुटाणा ता. कळमनुरी येथील कु. गंगा संभाजीराव कदम, शिक्षण क्षेत्रात कळमनुरी येथील शंकरराव सातव महाविद्यालयाचे प्राचार्य पंडित शिंदे, उद्योग क्षेत्रात हिंगोली येथील मिनाक्षी प्रकाश राजगुरु यांचा समावेश आहे.

दैनिक निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस

महाराष्ट्रातील दै. आत्ताच एक्सप्रेस या लोकप्रिय वृत्तपत्राच्या परभणी-नांदेड व हिंगोली आवृत्तीसाठी तालुका व शहर पातळीवर अनुभवी किंवा नवीन पत्रकार नेमणे आहे. ज्यांना पत्रकारीता क्षेत्रात काम करण्याची आवड आहे अशा होतकरु पत्रकारांनी संपर्क करावा.

नांदेड जिल्हा : अर्धापुर, भोकर, बिलोली, देगलूर, हदगाव, हिमायतनगर, कंधार, लोहा, मुदखेड, मुखेड, नांदेड, नायगांव आणी उमरी

परभणी जिल्हा : परभणी, गंगाखेड, सोनपेठ, पाथरी, मानवत, पालम, सेलू, जिंतुर आणि पुर्णा

हिंगोली जिल्हा : हिगोली, कळमनुरी, वसमत, औंढा नागनाथ आणि सेनगाव

लक्ष्मीकांत नामदेवराव मुंडे
आवृत्ती संपादक : आत्ताच एक्सप्रेस
संपादक : मराठीबाणा न्युज LIVE
अध्यक्ष : महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ,किनवट

संपर्क कार्यालय : उपजिल्हा रुग्णालय मार्ग,गोकुंदा ता.किनवट जि.नांदेड
मो.9022822289, 7066650600
Email : attachexpressparbhani@gmail.com

# रसायनशास्त्र पेपरला जिल्ह्यातील बेशिस्त बैठे पथकास केले निलंबित

## परीक्षा कामात हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही- जिल्हाधिकारी

* लक्ष्मीकांत मुंडे
आत्ताच एक्सप्रेस

**नांदेड –** दिनांक १८ फेब्रुवारी रोजी इयत्ता १२ वीचा सकाळ सत्रातील रसायनशास्त्र विषयाचा पेपर होता. या दिवशी देखिल जिल्हयातील १०९ केंद्रांवर बैठे पथका मार्फत झूम वेबकास्टद्वारे पुर्णवेळ परीक्षेचे नियंत्रण करण्यात आले होते.

आजच्या पेपरला उमरी तालुक्यातील नूतन उच्च माध्यमिक विदयालय, येथील परीक्षा केंद्रावर नियुक्त बैठे पथक प्रमुख व सदस्य गैरहजर असल्यामूळे त्यांना निलंबीत करण्याचे आदेश जिल्हाधिकारी राहूल कर्डीले यांनी संबंधित विभागांना दिले. यामध्ये बैठे पथक प्रमुख विस्तार अधिकारी कृषी नरहरी मुंजाळ, बैठे पथक सदस्य केंद्रप्रमुख मोहन भोसले, ग्राम महसूल अधिकारी पांडूरंग गुब्रे हे बैठै पथकातील सदस्य परीक्षेच्या केंद्रावर गैरहजर होते. तसेच त्यांनी कोणतीही पुर्वसूचना दिली नाही. यामुळे संबंधितांना परीक्षा कामात हलगर्जीपणा केल्याचा ठपका ठेवून कर्तव्यात कसूर केल्याने सेवेतून निलंबीत करण्यासाठी संबंधित विभाग प्रमुखांना निर्देश जिल्हाधिकारी कर्डीले यांनी दिले आहेत.

आजच्या सकाळच्या रसायनशास्त्र पेपरला एकुण २४४०६ परीक्षार्थ्यांपैकी २४०७३ परीक्षार्थी उपस्थित होते.

याप्रमाणे उपस्थितीची टक्केवारी ९८.६४ होती. तर दुपारच्या राज्यशास्त्र पेपरसाठी एकुण १३२०७ परीक्षार्थ्यांपैकी १२५९४ उपस्थित होते. याप्रमाणे दुपारच्या पेपरला उपस्थितीची टक्केवारी ९५.३६ होती.

प्रत्येक केंद्रांवर बैठे पथकामार्फत झूम वेबकास्टद्वारे तसेच ड्रोन आणि व्हिडीओ कॅमेराद्वारे पुर्णवेळ परीक्षेवर नियंत्रण ठेवण्यात आले होते. यामुळे स्व.संगितादेवी उच्च माध्यमिक आश्रमशाळा दहेली तांडा ता.किनवट येथील परीक्षा केंद्रावर एक विद्यार्थी गैरप्रकार करतांना आढळून आल्यामुळे सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी झेनित चंद्र दोंतुला यांनी त्याचेविरुध्द मंडळ नियमाप्रमाणे कारवाई करुन तसा अहवाल मंडळाकडे पाठविला. तसेच सदर केंद्रावर मंडळाच्या निर्देशाप्रमाणे तसेच कॉपीमुक्त अभियानाचा भाग म्हणून उर्वरीत प्रश्नपत्रिका सीसीटीवीच्या निगराणीत ठेवण्यात आल्या नाहीत, परीक्षार्थ्यांना व्यवस्थित तपासून सोडले नाही, अधिकचा पोलीस बंदोबस्त मागविण्यात आला नाही यास संबंधित केंद्रसंचालक श्री गुटटे यांना जबाबदार धरून त्यांना निलंबीत करण्यासाठी संबंधित शाळा व्यवस्थापनास निर्देश दिले आहेत.

स्व.संगिता देवी उच्च माध्यमिक आश्रमशाळा, दहेली तांडा ता.किनवट येथील मूळ मुख्याध्यापक पांडूरंग आडे यांनी सदर केंद्र परिसरात आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध करुन दिले नसल्यामुळे परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात घेण्यात अडथळा निर्माण झाल्यामुळे संबंधितांना सेवेतून निलंबीत करण्यासाठी संचालक, इतर मागास व बहुजन कल्याण विभाग, नांदेड यांना कळविले आहे.

तसेच संत नामदेव महाराज कनिष्ठ महाविदयालय, पेठवडज ता.कंधार येथील परीक्षा केंद्रावर दोन विदयार्थी गैरप्रकार करतांना आढळून आल्यामुळे उपजिल्हाधिकारी अजय शिंदे यांनी त्यांचेविरुध्द मंडळ नियमाप्रमाणे कारवाई करुन तसा अहवाल मंडळाकडे पाठविला आहे.

तसेच संबंधित दहेली तांडा व पेठवडज येथील केंद्रसंचालकांना तडकाफडकी बदलून इतर केंद्रसंचालकांची त्यांचे जागेवर नियुक्ती केली आहे, अशी माहिती माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी प्रसिद्धी पत्रका द्वारे दिली आहे.



# राज्यस्तरीय शस्त्रांग मार्शल आर्ट स्पर्धेत श्रीवेद बोलेनवारची दमदार कामगिरी

* लक्ष्मीकांत मुंडे
आत्ताच एक्सप्रेस

**किनवट–** छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय शालेय शस्त्रांग मार्शल आर्ट स्पर्धेत रामनगर येथील श्रीवेद सुनील बोलेनवार याने उल्लेखनीय कामगिरी करत कांस्पदक पटकावले. स्पर्धे दरम्यान उपस्थित मान्यवरांच्या हस्ते त्याचा सत्कार करण्यात आला.

या यशाबद्दल त्याला मार्गदर्शन करणारे प्रशिक्षक तसेच सहकार्य करणाऱ्या खेळाडू व कुटुंबीयांचे अभिनंदन करण्यात आले.

विद्यार्थ्याच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण असून पुढील स्पर्धांसाठी त्याला शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# भूमी अभिलेखचे कर्मचारी संपावर



* लक्ष्मीकांत मुंडे
आत्ताच एक्सप्रेस

**श्रीक्षेत्र माहूर –** जमिनीची मोजणी आणि हद्द निश्चिती करणाऱ्या भूमी अभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांनी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. समान काम, समान वेतन या तत्त्वानुसार तांत्रिक वेतनश्रेणी लागू करावी, या प्रमुख मागणीसाठी राज्यव्यापी असहकार आंदोलन करण्याचा निर्णय भूमी अभिलेख कर्मचारी कृती समितीने घेत आज पासून आंदोलन सुरू करण्यात आले याबाबतचे निवेदन १८ फेब्रुवारी रोजी माहूरचे तहसीलदार अभीजित जगताप यांना देण्यात आले

भूमी अभिलेख विभागाचा कणा असलेल्या भूकरमापक पदासाठी शैक्षणिक पात्रता अभियांत्रिकी पदवी पदविका आहे. त्यांचे काम पूर्णपणे तांत्रिक स्वरूपाचे असूनही त्यांना लिपिक वर्गीय वेतन दिले जाते. दुसरीकडे वन विभाग आणि महापालिकांमध्ये याच पदाला तांत्रिक वेतनश्रेणी लागू आहे. विशेष म्हणजे मॅटने अद्याप कर्मचाऱ्यांच्या बाजूने निकाल देऊनही शासनाने अंमलबजावणी न केल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे

१८ फेब्रुवारी मोजणी साहित्य जमा करून काळ्या फिती लावून कामकाज सुरू करण्यात आले २० फेब्रुवारी मोजणी काम पूर्णपणे बंद. २३ ते २६ फेब्रुवारी सामूहिक रजा आंदोलन. २७ फेब्रुवारी पुण्यात जमाबंदी आयुक्त कार्यालयावर आक्रोश मोर्चा २ मार्चपासून राज्यव्यापी बेमुदत संप करण्यात येणार आहेत त्या अनुषंगाने तहसीलदार अभिजीत जगताप यांना एम. जी. कदम प. भू.डी. बी. आईटवार क.ली.

एम व्ही चौधरी भूमापक एच. डी डाखोरे आ. जा. लि.एम. जी. मरशिवणे भूमापक यांनी निवेदन दिले आहे. आंदोलनामुळे जमिनीची हद्द मोजणी, कोर्टाच्या मोजण्या, वाटणीचे नकाशे, सिटी सर्व्हे व शासकीय प्रकल्पांच्या महामार्ग, धरणे भूसंपादनाच्या मोजणीवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.

# बारावी परीक्षा कॉपीमुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने कडक उपाययोजना, विशेष भरारी पथकाची कारवाई

* लक्ष्मीकांत मुंडे
आत्ताच एक्सप्रेस

**नांदेड–** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १२ वी) मार्च२०२६ ही परीक्षा कॉपीमुक्त, पारदर्शक, निर्भय व शांततापूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्यावतीने सर्वंकष नियोजन व कडक उपाययोजना राबविण्यात येत आहेत. जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांच्या स्पष्ट आदेशानुसार जिल्ह्यातील विविध परीक्षा केंद्रांवर विशेष भरारी पथके नियुक्त करण्यात आली आहेत.

जिल्हाधिकारी यांच्या निर्देशानुसार उपजिल्हाधिकारी (सामान्य) अजय शिंदे यांच्या नेतृत्वाखालील विशेष भरारी पथकाने कंधार तालुक्यातील पेडवडज येथील संत नामदेव महाराज ज्युनिअर कॉलेज या उच्च माध्यमिक परीक्षा केंद्रावर आज अचानक भेट देऊन तपासणी केली.




तपासणीदरम्यान परीक्षा सुरू असताना संपूर्ण प्रक्रियेची बारकाईने पाहणी करण्यात आली. पर्यवेक्षकांची उपस्थिती, परीक्षार्थ्यांची बैठक व्यवस्था, प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिकांची सुरक्षितता तसेच परीक्षेतील शिस्त यांची सखोल तपासणी करण्यात आली. यावेळी दोन परीक्षार्थी कॉपी करत असल्याचे निदर्शनास आले. ही बाब महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या नियमांचे गंभीर उल्लंघन असल्याने संबंधित परीक्षार्थींवर तत्काळ नियमांनुसार कारवाई करण्यात आली आहे.

सदर प्रकरणाचा सविस्तर अहवाल तयार करून सक्षम प्राधिकरणाकडे सादर करण्यात आला असून पुढील आवश्यक कार्यवाही सुरू आहे. परीक्षा प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार, अनैतिक मार्ग किंवा शिस्तभंग खपवून घेतला जाणार नाही, असा स्पष्ट इशारा जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांनी दिला आहे.

परीक्षा काळात सर्व परीक्षा केंद्र प्रमुख, केंद्र संचालक, पर्यवेक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी पूर्ण जबाबदारीने व दक्षतेने काम करणे बंधनकारक असून कोणत्याही स्तरावर निष्काळजीपणा किंवा नियमभंग आढळल्यास संबंधितांवर कठोर प्रशासकीय कारवाई करण्यात येईल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांनी कोणत्याही गैरमार्गाचा अवलंब न करता स्वतःच्या कष्टावर व प्रामाणिकपणे परीक्षा द्यावी. पालक, शिक्षक व नागरिकांनीही विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करून कॉपीमुक्त परीक्षा अभियानास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व परीक्षा केंद्रांवर अशा प्रकारच्या अचानक तपासण्या सुरू राहणार असून परीक्षा प्रक्रियेची पवित्रता, विश्वासार्हता व गुणवत्तेचे मूल्य जपण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध आहे.

# मुख्यमंत्री बळीराजा शेत,पाणंद रस्ते योजनेला वेग

## अतिक्रमणमुक्त, बारमाही रस्त्यांसाठी शासनाची कडक भूमिका; नुकसान केल्यास फौजदारी कारवाई

* लक्ष्मीकांत मुंडे
आत्ताच एक्सप्रेस

**नांदेड –** ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना मजबूत, दर्जेदार व बारमाही शेत/पाणंद रस्ते उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना राबविण्यात येत आहे.

योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कंधार येथे विधानसभा क्षेत्रस्तरीय समिती गठीत करण्यात आली असून समितीचे अध्यक्ष आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी उपविभागीय अधिकारी कार्यालय, कंधार येथे संबंधित अधिकारी व यंत्रणांची बैठक घेऊन कामकाजाला गती देण्याच्या सूचना दिल्या.



या योजनेअंतर्गत शेतात जाणारे व शेतीमाल वाहतुकीसाठी वापरले जाणारे पाणंद रस्ते अतिक्रमणमुक्त करून यंत्रसामग्रीच्या सहाय्याने मजबुतीकरण करण्यात येणार आहे. रस्ते वर्षभर वापरण्यायोग्य राहतील यासाठी गुणवत्ता नियंत्रणाची विशेष तरतूद करण्यात आली आहे. शेत/पाणंद रस्त्यांचे सर्वेक्षण, क्रमांकन, अतिक्रमण हटविणे व कायदेशीर कारवाई ही कामे ग्रामपंचायत, महसूल विभाग व संबंधित यंत्रणांच्या समन्वयातून केली जाणार आहेत.

रस्ता तयार झाल्यानंतर त्याचे नुकसान करणाऱ्या व्यक्तींवर शासकीय मालमत्तेचे नुकसान केल्याप्रकरणी फौजदारी कारवाई केली जाणार आहे. वारंवार नुकसान केल्यास भारतीय न्याय संहिता कलम १२९ अन्वये कठोर कारवाईची तरतूद आहे. ही योजना ग्रामीण दळणवळण सुलभ करून शेती विकासाला चालना देणारी ठरणार आहे. शेतकऱ्यांनी अतिक्रमण स्वयंस्फूर्तीने दूर करून योजनेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी तथा समिती सदस्य सचिव विलास नरवटे यांनी केले आहे.

# आज शिवजयंती निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन, भव्य आरोग्य शिबिर,शिवगीतांचा बहारदार कार्यक्रम

आत्ताच एक्सप्रेस

**हिंगोली–** शिवप्रतिष्ठान शिवजयंती निमित्त गांधी चौक येथे दिनांक १९ शिवजयंती निमित्त दुपारी एक वाजता भव्य आरोग्य शिबिर तसेच तीन ते सात वाजेपर्यंत कराओके शिव गीतांचा बहारदार कार्यक्रम सादर करण्यात येणार आहे सदर आरोग्य शिबिराचा लाभ शहरातील नागरिकांनी घ्यावा असे आवाहन समितीतर्फे करण्यात आले आहे शिबिरात नामांकित डॉक्टर सेवा देणार आहेत तसेच आरोग्य विभाग यांचे मार्फत मोफत औषधी वाटप सुद्धा करण्यात येणार आहे यासाठी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गणेश जोगदंड आरोग्य कर्मचारी अशा स्वयंसेविका परिश्रम घेत आहेत. त्यामध्ये सांधेदुखी, रक्तदाब, रक्त शरकरा कॅन्सर पोटाचे विकार छातीचे विकार त्वचा विकार व इतर विविध आजारांवर प्राथमिक तपासणी व औषधोपचार मोफत करण्यात येणार आहेत या शिबिरासाठी नामांकित डॉक्टर निमंत्रित केले आहेत ज्यांना या शिबिरात सेवा द्यायची आहे त्यांनी शिबिर स्थळी येण्याचे आवाहन समितीतर्फे करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे त्यानंतर लगेच चार ते सात वाजेपर्यंत हिंगोली येथील येथील स्थानिक गायन कलाकार शिव गीतांवर पोवाडे कराओके गीतांचा बहारदार कार्यक्रम सादर करणार आहेत. सदर कार्यक्रमासाठी जोरदार तयारी करण्यात आली आहे व कलाकार मेहनत घेत आहेत या कार्यक्रमास उपस्थित राहून या अगोदर कधी न ऐकलेली शिव गीते ऐकण्याची संधी तसेच पोवाडे गायनासाठी शाहिरी जलसा तयार आहे. या ब कार्यक्रमाचा आस्वाद घेण्याचे आवाहन हिंगोली कर नागरिकांना करण्यात येत आहे. या कार्यक्रमास मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. संयोजक म्हणून रत्नाकर महाजन, संजय खिल्लारे, गजानन उदावंत आदी परिश्रम घेत आहेत. वरील कार्यक्रमात उपस्थित राहण्याचे आवाहन विजय शिंदे यांनी केले आहे.

# विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांनी यूडीआयडी व आधार संलग्नीकरण तात्काळ करावे

* लक्ष्मीकांत मुंडे
आत्ताच एक्सप्रेस

**नांदेड –** राज्य शासनाच्या दिव्यांग कल्याण विभागाच्या सूचनांनुसार विशेष सहाय्य योजनेंतर्गत लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांचे यूडीआयडी कार्ड व आधार कार्ड संलग्नीकरण करण्याबाबत स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

त्यानुसार विशेष सहाय्य योजनेंतर्गत लाभ घेणाऱ्या सर्व दिव्यांग लाभार्थ्यांनी आपले वैश्विक ओळखपत्र, आधार कार्ड तसेच बँक खात्याची छायांकित प्रत तात्काळ संगणकीय कार्यालय, शहर नांदेड जिल्हाधिकारी कार्यालय परिसर येथे सादर करावी.

निर्देशांचा विचार करूनही संबंधित कागदपत्रे सादर न केल्यास होणाऱ्या गैरसोयीस तसेच अनुदान बंद झाल्यास संबंधित लाभार्थी स्वतः जबाबदार राहतील, असे प्रशासनाकडून कळविण्यात आले आहे. तरी सर्व संबंधित दिव्यांग बांधवांनी आवश्यक कागदपत्रे वेळेत सादर करून योजनांचा लाभ अखंडित ठेवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



# गृह विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा म्हैसकर पाटणकर यांचा सत्कार

आत्ताच एक्सप्रेस

**हिंगोली–** महाराष्ट्र राज्याचे गृह विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव पदी नियुक्ती झाल्या बद्दल सौ मनीषा पाटणकर म्हैसकर मॅडम यांच्या सत्कार नगरपरिषद कर्मचारी व संवर्ग कर्मचारी संघटनेचे वतीने प्रमुख विश्वनाथ घुगे हिंगोलीकर, राज्यध्यक्ष सुरेश पासतांडेल, राज्य उपाध्यक्ष गिरीश डुबेवार, धर्मा खिल्लारे,शिवहरी शेटे, गोवर्धन सोनवणे, इंद्रजीत गुंजार्गे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# अस्वल हल्ल्यात मृत्यू झालेल्या दुसऱ्या व्यक्तीच्या कुटुंबीयांना वनविभागाकडून १० लाखांची आर्थिक मदत

* लक्ष्मीकांत मुंडे
आत्ताच एक्सप्रेस

**किनवट –** दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी वन्यप्राणी अस्वलाच्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेले चंद्रसिंग शेषेराव राठोड यांचा छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय घाटी रुग्णालयात उपचारादरम्यान दि. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. शासनाच्या नियमांनुसार त्यांच्या पश्चात वारसदारांना तात्काळ आर्थिक मदत देण्यात आली. मृतकांच्या कुटुंबीयांमध्ये १) सौ. कल्पनाबाई चंद्रसिंग राठोड (पत्नी) २) कुमार चंद्रसिंग राठोड (मुलगा) ३) धर्मराज चंद्रसिंग राठोड (मुलगा) यांना वन विभागामार्फत १० लाख रुपयांचा धनादेश प्रदान करण्यात आला. वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.) आप्पारावपेठ उमेश ढगे यांच्या हस्ते धनादेश सुपूर्द करण्यात आला. यावेळी वनपरिमंडळ अधिकारी श्रीराम व्ही. सज्जन, डी. डी. कडमपल्ले, वनरक्षक मलकजाम (उ.), वनरक्षक कृष्णा घायाळ, आर. आर. वनवे, संतोष सारगुडे, गणेश सपकाळ, बी. टी. जाधव, वसंत भालेराव, वाहन चालक ज्ञानेश्वर माहुरे, संगणक चालक कुलदीप पाटील यांच्यासह सरपंच, उपसरपंच, पोलिस पाटील, नाईक व गावातील ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.




या आर्थिक मदतीमुळे दुःखद प्रसंगात कुटुंबाला दिलासा मिळाला असून वन विभागाच्या तत्परतेबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंडे यांनी फाईन प्रिंट, १४०७०, खोकडपूरा, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र), येथे छापून लक्ष्मी ऑफसेट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या जवळ, रेल्वे स्टेशन रोड, परभणी जि.परभणी–४३१४०१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. मुख्य कार्यालय ०२४०–२४७४८१३ * संपादक - सुग्रीव सोपानराव मुंडे मो.9421281078, RNI.No.MAH/MAR2014/56289

The Printer, Owner & Publisher Sugriv Sopanrao Munde Fine print,14070,khokadpura, Aurangabad-431001 (M.H.) Laximi offset,Near Dr.babasahen ambedkar,statue,station road, parbhani Dist. Parbhani-431401.(edition editor Laximikan mundhe) (cheif Editor - Sugriv Sopanrao Munde) Office Ph. : 0240-2474813